मंगलम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता:-स.नं. १२९/1 ब व स.न. १५९/1 अ. प्लॉट नं. १५, १६ मोहननगर, चिंचवड
नोंदणी क्र.:- पी.एन.ए.(एच.एल.आय) एच.एस.जी.(टी.सी.)/२५२१/९२/९३

---

# पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

मंगलम सहकारी गृहरचना संस्थेची पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १२.०१.२०२५ रोजी दुपारी ०१.३० वाजता संस्थेच्या आवारामध्ये आयोजित करण्यात आली होती. सभेस १९ सभासद उपस्थित होते. सभेचे कामकाज विषयानुसार सुरुवात करण्यास प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांनी सर्व सभासदांचे स्वागत करून सभेचे कामकाज चालु करण्यास अनुमती दिली.

**विषय क्रमांक ०१ :-** संस्थेचा फिजीबिलीटी रिपोर्ट संदर्भात चर्चा करणे.

**ठराव क्रमांक ०१:-** संजय सर यांनी पहिल्यांदा आपल्या प्लॉट विषयी माहिती सांगितली व अपल्या प्लॉट वर विकसक किती बांधकाम करू शकतो हे पॅरीमिटरच्या माध्यमातुन समजावून सांगितले.टेंडर प्रोसेस करताना कोण कोणत्या गोष्टी नमूद केल्या जातात.आपली इमारत ३० वर्ष जुनी असेल तर, आपल्याला इनसेंन्टीव चा फायदा मिळणार आहे व स्टॅच्युटरी कॉस्ट काय आसते.कार्पेट एरिया बाबतीत कशा प्रकारे कॅलक्युलेशन करतात. आपण जो फिजिबिलीटी रिपोर्ट काढलेला आहे त्याचा उपयोग टेंडर मागवतो त्यावेळी होतो. सर्व सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांचे शंका निरसन करण्यात आले.

**विषय क्रमांक ०२:-** पुढील कार्यवाहीची दिशा ठरविणे.

**ठराव क्रमांक ०२:-** सभेमध्ये घेतलेल्या फिजिबिलीटी रिपोर्टला मान्यता देऊन निविदा प्रक्रियेसाठी पुढील कार्यवाही सुरु करून संस्थेसाठी टेंडर नोटिस तयार करून संस्थेला पाठवावी असे ठरले.त्यानंतर संस्थेच्या वतीने सभासदांचे आणि श्री. संजय सर यांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.